
परळी **संघर्षनेता**
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे
बीड वर्षे- 10 वे | अंक क्र. 202 बुधवार दि. 06 ऑगस्ट 2025 पृष्ठे 4 किंमत 2 ₹ RNI: MAHMAR/2016/67060




या जागेवर आपल्या संस्था,फर्मची जाहिरात घेणे आहे

# ठरलं ,दिवाळी नंतर जिल्हा परिषद, पंचायत समिती,नगरपालिकांच्या निवडणुका

## राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्तांनी दिली माहिती



राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी दिवाळीनंतर म्हणजेच ऑक्टोबर अखेरीस प्रक्रिया सुरु होणार असल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी दिली. आज नाशिक विभागातील आगामी निवडणुकांबाबत आढावा बैठक घेण्यात आली असून, नाशिकसह उत्तर महाराष्ट्रातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यावेळी उपस्थित होते.

या बैठकीनंतर दिनेश वाघमारे यांनी पत्रकार परिषद घेत निवडणूकपूर्व तयारीची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यांच्या आत निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार, मनपा, जिल्हा परिषद आणि नगरपालिका अशा सर्व निवडणुकांचा टप्प्याटप्प्याने कार्यक्रम आखण्यात येणार आहे. नाशिक विभागात एकूण 50 लाख 45 हजार मतदार असून 4,982 मतदान केंद्रे आहेत. यासाठी 8,705 कंट्रोल युनिट्स लागणार असून 17,000 पेक्षा अधिक मतदान यंत्रांची आवश्यकताआहे.सर्वनिवडणुका एकत्र घेतल्यास मनुष्यबळाची मोठी अडचण येणार आहे. त्यामुळे निवडणुका टप्प्याटप्प्याने घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र, प्रथम कोणत्या संस्थेची निवडणूक होणार, हे अद्याप निश्चित करण्यात आलेले नाही, असे दिनेश

पान 3 वर

## OBC आरक्षणासाठी लॉटरी पद्धत, SC-ST आरक्षण निश्चित

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाबाबत माहिती देताना वाघमारे म्हणाले की, SC-ST आरक्षण निश्चित असते, परंतु OBC आरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार लॉटरी पद्धत अवलंबली जाणार आहे. त्यांनी स्पष्ट केले की, “मागील निवडणुकांमध्येही ओबीसी आरक्षण (OBC Reservation) होते आणि यावेळीही तेच तत्त्व पाळले जाणार आहे.”

## » VV-PAT यंत्रांचा वापर होणार नाही

या निवडणुकांमध्ये VV-PAT यंत्रे वापरण्यात येणार नाहीत, असेही वाघमारे यांनी स्पष्ट केले. तर दिवाळीनंतर म्हणजे ऑक्टोबर अखेरनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक प्रक्रियेला सुरुवात होणार असल्याची माहिती देखील त्यांनी दिली आहे.

## मतदार यादी आणि प्रभाग रचनेवर काम सुरु

1 जुलै 2025 पर्यंतच्या मतदार यादीच्या आधारे निवडणूक घेण्यात येणार आहे. प्रारुप प्रभाग रचना निश्चित झाल्यावर पुढील प्रक्रिया राबवली जाईल. निवडणुकीसाठी आवश्यक असणारे अधिकारी, कर्मचारी व तांत्रिक यंत्रणा यांचा आढावा देखील बैठकीत घेण्यात आला.

# आदित्य आणि उद्धव ठाकरे दिल्ली दौऱ्यावर

## राहुल गांधींसोबत डिनर डिप्लोमसी




राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्था आणि महापालिकेच्या निवडणुका दिवाळीनंतर होणार आहेत. या पार्श्वभूमीवर दिल्लीमध्ये इंडिया आघाडीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला शिवसेना ठाकरे गटाचे सर्वेसर्वा उद्धव ठाकरे 3 दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर जाणार आहेत. यावेळी त्यांच्यासोबत आमदार आदित्य

पान 3 वर

# आज ठळक

## परळीतील पो.ह.मारुती मुजमुले यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षकपदी बढती

### सर्व स्तरातून अभिनंदन



परळी वैजनाथ, प्रतिनिधी. परळी शहर पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार म्हणून कार्यरत असलेले सर्व परिचित पोलीस कर्मचारी मारुती द्वारकोबा मुजमुले यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदी पदोन्नती करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश नुकतेच निर्गमित करण्यात आले आहेत. या बढती बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी जिल्ह्यातील पोलीस हवालदार पदावरील पदोन्नती झालेल्या कर्मचाऱ्यांची यादी नुकतीच जाहीर केली असुन यामध्ये परळी शहर पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार म्हणून कार्यरत असलेले व एक सुसंस्कृत, सुस्वाभावी, संयमी पोलीस कर्मचारी म्हणून ओळख असलेले मारुती मुजमुले यांची पदोन्नती करण्यात आली आहे. सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक म्हणून त्यांना मिळालेल्या या भरतीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.






वैद्यनाथ बँक संचालक मंडळ निवडणूक 2025

# वैद्यनाथ परिवर्तन पॅनलच्या विजयावर सभासद मतदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद

## सोनपेठ, पाथरी, माजलगाव, धारुर तालुक्यातील मतदारांच्या उमेदवारांनी घेतल्या भेटी



परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

वैद्यनाथ बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक महाविकास आघाडीकडून लढवल्या जात आहे. आघाडीतील सर्व मित्र पक्षांनी एकत्र येऊन वैद्यनाथ परिवर्तन पॅनल स्थापित केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड हे भटक्या विमुक्त मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत तर बाबासाहेब शिंदे आणि वैजनाथ धमपलवार हे सर्वसाधारण मतदारसंघातून निवडणुकीस उभे आहेत. सर्व उमेदवारांच्या प्रत्यक्ष गाठीभेटी घेण्यावर भर दिला जात असून, मंगळवार, दिनांक 05 ऑगस्ट रोजी सोनपेठ, पाथरी, माजलगाव, धारुर, वडवणी येथील मतदारांच्या भेटीचा दौरा करण्यात आला. सर्व

पान 3 वर

वैद्यनाथ बँकेच्या सुरक्षित भविष्य आणि वेगवान प्रगतीसाठी लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन

# » लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या विजयासाठी शहरात भव्य प्रचार फेरी



परळी वैजनाथ (प्रतिनिधी)


वैद्यनाथ को - ऑपरेटिव्ह बँकेच्या सुरक्षित भविष्य आणि वेगवान प्रगतीसाठी राज्याच्या पर्यावरण हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या उमेदवारांनाच प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन भजपा - राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) - शिवसेना (शिंदे) महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी केले. लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या प्रचारासाठी शहरात भव्य प्रचार फेरी काढण्यात आली. यावेळी मतदारांनी उत्स्फूर्तप्रतिसाद दिला.

वैद्यनाथ को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळासाठी

पान 3 वर

# टिव्ही 9मराठीचे प्रतिनिधी संभाजी मुंडे यांना वंजारी समाजरत्न पुरस्कार जाहीर

## रविवारी होणार नाशिक येथे पुरस्कार वितरण सोहळा



नाशिक( प्रतिनिधी) न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र राज्य संचलित वर्धापन दिन निमित्त वंजारी समाजरत्न पुरस्कार 2025 चा टिव्ही 9मराठीची संभाजी मुंडे यांना वंजारी समाजरत्न पुरस्कार जाहीर झाला असून श्री मुंडे यांचे सर्वस्तरातुन अभिनंदन होत आहे.

न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र राज्य संचलित वर्धापन दिन निमित्त वंजारी समाजरत्न पुरस्कार 2025चेआयोजन रविवार दिनांक 10 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी अकरा वाजता संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री मा. नामदार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, माजी मंत्री श्री धनंजय मुंडे साहेब , माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे ,माजी आ. गोविंद केंद्रे, ह भ प डॉ. तुळशीरामजी गुट्टे महाराज, श्री अनिल गर्जे,श्री .कोंडाजी मामा आव्हाड, उद्योजक बुधाची दादा पानसरे, माजी मंत्री खा. भागवतराव कराड, श्री.मोहन दादा घुगे, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ह भ प प्रकाश महाराज साठे, ह भ प सोपान महाराज शास्त्री आदी

पान 3 वर

# वैद्यनाथ बँक संचालक मंडळ निवडणूकीत लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या उमेदवारांना विजयी करा - सौ. उमाताई समशेट्टे



परळी वैजनाथ सभासदांच्या हितासाठी, बँकेचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री, जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखालील लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन भाजपच्या शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टे यांनी केले.

वैद्यनाथ को-ऑपरेटिव्ह बँक संचालक मंडळ निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर ना. पंकजाताई मुंडे यांच्या संपर्क कार्यालयात भाजपच्या शहराध्यक्षा सौ. उमाताई समशेट्टे यांच्या अध्यक्षतेखाली शहर पदाधिकारी, शक्तीकेंद्र

पान 3 वर









संपादकीय

# खास माणूस..!

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महाराष्ट्रामध्ये याच वर्षात होणार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका आणि महानगरपालिका होत. साधारणतः, दिवाळीनंतर आचारसंहिता लागेल आणि टप्प्याटप्प्याने या निवडणुका होतील, अशी सूत्रांनी दिलेली माहिती आहे. हे सूत्र कोण असतात आणि कुठे असतात, याविषयी कोणालाही माहिती नसते. या सूत्रांना कुणी पाहिलेले नसते; पण ते असतात हे निश्चित. तर सांगायचा मुद्दा असा की, लवकरच राज्यातील राजकारण पुन्हा एकदा ढवळून निघणार आहे. आपल्या पक्षाची प्रत्येक जिल्ह्यातील तयारी पाहण्यासाठी आणि संभाव्य उमेदवारांची चाचपणी करण्यासाठी नेते मंडळींचे राज्यभर दौरे सुरु आहेत. सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांच्या दौऱ्यांना भरघोस प्रतिसाद असतो, त्यामानाने विरोधी पक्षांच्या नेत्यांना कमी प्रतिसाद असतो. राज्य पातळीवरील नेते आपल्या जिल्ह्यात येणार म्हटल्यानंतर सर्वात प्रथम बॅनर लावण्याची स्पर्धा सुरु होते. भरधाव वेगाने येणाऱ्या नेत्याला गाडीमध्ये बसून बॅनर पाहायला मिळेल की नाही, याची शंकाच वाटते; परंतु आवर्जून बॅनर लावले जातात. प्रत्येक जिल्ह्यामध्ये प्रत्येक नेत्याची काही खास माणसे असतात. ही खास माणसे आपल्या नेत्याचा चेहरा आणि आपणही मोठ्या आकारात दिसावे, असे बॅनर लावतात. राज्य पातळीवरील नेत्यांना राज्यभरात पक्ष चालवायचा असतो, त्यामुळे त्यांनाही अशा कार्यकर्त्यांना सांभाळायला लागते. सर्वप्रकारच्या पक्षाच्या नेत्यांना साहेब म्हटले जाते.

साहेब आल्यानंतर साहेबांशी आपली किती जवळीक आहे हे दाखवण्यासाठी व्यासपीठावर साहेबांच्या पाठीमागून जाऊन कानात काहीतरी कुजबूज करणे अत्यंत महत्त्वाचे असते. अशा वेळेला एक फोटोग्राफर तयार ठेवला जातो आणि खास माणूस आणि साहेब एकमेकांशी हितगुज करतानाचे फोटो घेतले जातात. हेच फोटो पुढे एनलार्ज करुन कार्यकर्त्यांच्या बैठकीत लावले जातात. तुम्ही एखाद्या मोठ्या कार्यकर्त्याच्या घरी गेलात की दिवाणखान्यामधील फोटो पाहूनच तुम्हाला हा कार्यकर्ता कुणाचा माणूस आहे, हे समजत असते. अशी खास माणसे पक्षाने जागोजागी पेरलेली असतात. ही खास माणसे पक्ष चालवत असतात.

दुसरी तयारी म्हणजे, पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरील नेत्याचे आगमन झाल्यानंतर त्यांना घालण्यासाठी भला मोठा हार आणला जातो. हा हार किमान पाच ते सहा किलो वजनाचा असतो आणि अर्थातच नेत्याची मान तो हार झेपण्याइतकी सक्षम नसते. वरिष्ठ पातळीवरील नेते कधीच एकटे येत नाहीत. त्यांच्यासोबत आणखी वरिष्ठ पातळीवरील दोन-तीन नेते येऊन स्वागत स्वीकारत असतात; मग अशा सर्व मोठ्या नेत्यांना एकत्रित करुन त्यांना एकच भला मोठा हार घातला जातो. हार घालताना जी अहमहमिका चालते ती आपण साहेबांच्या जवळचे आहोत हे सिद्ध करण्यासाठी असते.




# उच्च शिक्षण संस्थांचे आंतरराष्ट्रीयीकरण – सहयोग व आदानप्रदान

**डॉ. भारत कऱ्हाड**

21व्या शतकात ज्ञान ही एक जागतिक संकल्पना झाली आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे शिक्षण क्षेत्रातही भौगोलिक सीमा झपाट्याने नाहीशा होत आहेत. विशेषतः उच्च शिक्षण क्षेत्रात हे अधिक प्रकर्षाने जाणवते. भारतासारख्या देशासाठी, जागतिक शैक्षणिक प्रगतीशी समांतर राहण्यासाठी, आपल्या विद्यापीठांनी आंतरराष्ट्रीयीकरणाचा स्वीकार करणे ही काळाची गरज बनली आहे.

'आंतरराष्ट्रीयीकरण' म्हणजे केवळ परदेशात शिक्षण घेणे किंवा परदेशी विद्यार्थी भारतात शिकण्यासाठी येणे एवढ्यावर मर्यादित नाही. यामध्ये ज्ञान, संशोधन, विद्यार्थी व प्राध्यापक यांची देवाणघेवाण, अभ्यासक्रमांचे समायोजन, शैक्षणिक धोरणांचा समन्वय आणि मूल्यव्यवस्थेचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील समावेश होतो. ही प्रक्रिया विद्यार्थ्यांमध्ये जागतिक दृष्टिकोन, सहिष्णुता आणि सांस्कृतिक समज निर्माण करण्यास मदत करते.

विद्यार्थी आणि प्राध्यापक विनिमय कार्यक्रम हे आंतरराष्ट्रीयीकरणाचे एक प्रभावी माध्यम ठरले आहे. अनेक भारतीय विद्यापीठांनी परदेशातील शैक्षणिक संस्थांशी सामंजस्य करार (MoUs) करून विद्यार्थ्यांना आणि प्राध्यापकांना परस्पर देशांमध्ये शिकण्याची, शिकविण्याची आणि अनुभव घेण्याची संधी दिली आहे. यामुळे केवळ शैक्षणिक आदानप्रदान होत नाही, तर वैचारिक व संस्कृतिक समृद्धीही घडते.

संयुक्त अभ्यासक्रम (Dual/Joint Degrees) ही आंतरराष्ट्रीय सहकार्याची पुढची पायरी आहे. यात विद्यार्थी शिक्षणाचा काही भाग भारतात तर काही भाग परदेशात पूर्ण करतात. परिणामी, त्यांना दोन्ही देशांच्या शैक्षणिक पद्धती, गुणवत्ता आणि रोजगार संधी यांचा लाभ मिळतो. अशा अभ्यासक्रमांमुळे जागतिक स्पर्धेत टिकणारे आणि परिवर्तनक्षम मनुष्यबळ घडते.

संशोधनाच्या क्षेत्रातही आंतरराष्ट्रीयीकरणाचे सकारात्मक परिणाम दिसून येतात. भारतातील संशोधन संस्था परदेशातील संस्थांशी एकत्रित संशोधन प्रकल्प राबवत आहेत. या माध्यमातून अधिक संशोधन निधी, तांत्रिक सहकार्य, व्यासपीठांची उपलब्धता आणि संशोधन गुणवत्तेचा विकास घडतो. जागतिक समस्या सोडवण्यासाठी विविध देशांतील संशोधक एकत्र येतात, हीच खरी ज्ञानाची समृद्धी होय.

विद्यापीठांचे जागतिक गुणवत्ता मानांकन (Global Rankings) देखील आंतरराष्ट्रीयीकरणाला चालना देतात. QS, THE, ARWU यांसारख्या आंतरराष्ट्रीय मानांकन संस्थांमध्ये स्थान मिळवण्यासाठी भारतीय विद्यापीठ प्रयत्नशील आहेत. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी, प्रकाशित संशोधन पेपर्स, आणि जागतिक सहकार्य यावर या मानांकनांचा भर असतो. त्यामुळे संस्थांना आपली शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याची प्रेरणा मिळते.

भारत सरकारनेही या प्रक्रियेला बळकटी देण्यासाठी अनेक उपक्रम सुरू केले आहेत. 'Study in India' उपक्रमाद्वारे परदेशी विद्यार्थ्यांना भारतात शिकण्याचे आमंत्रण दिले जाते. GIAN, SPARC, आणि ITEC सारख्या योजनांद्वारे परदेशी तज्ज्ञ आणि संशोधक भारतात बोलावले जातात. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP 2020) मध्येही आंतरराष्ट्रीय सहकार्याला प्राधान्य देण्यात आले आहे.

तरीही काही अडचणींवर मात करणे आवश्यक आहे. ग्रामीण आणि निम-शहरी भागातील महाविद्यालये आंतरराष्ट्रीय सहकार्यासाठी अजून पुरेसे सक्षम नाहीत. भाषेचा अडथळा, निधीची मर्यादा, आणि योग्य मार्गदर्शनाचा अभाव यामुळे अनेक संस्था या प्रक्रियेपासून दूर राहतात. त्यामुळे धोरणात्मक पातळीवर सर्वसमावेशक योजना राबवणे गरजेचे ठरते.

उच्च शिक्षण संस्थांचे आंतरराष्ट्रीयीकरण केवळ शैक्षणिक मूल्यवृद्धीपुरते मर्यादित नाही, तर ते विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व घडविणारे आहे. या प्रक्रियेमुळे विद्यार्थी अधिक समजूतदार, जागरूक आणि बहुसांस्कृतिक दृष्टिकोन असलेले नागरिक म्हणून घडतात. संस्थाही अधिक सर्जनशील, तंत्रसमृद्ध आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सक्षम बनतात.

एकूणच, भारतातील उच्च शिक्षण संस्थांनी आपली मूल्यव्यवस्था जपत, जागतिक निकष आणि दर्जाशी सुसंगत राहून आंतरराष्ट्रीय सहकार्याचा स्वीकार करणे आवश्यक आहे. हे सहकार्य देशाच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीचा पाया बनू शकते. ज्ञानाच्या जागतिक प्रवाहात भारताने नेतृत्वाची भूमिका बजावावी, हीच या संकल्पनेची अपेक्षा आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड**
**(प्राचार्य, लेखक व धोरण विश्लेषक)**

# चला जरा विचार करू या!




कोणत्याही एका मोठ्या घटनेचा समग्र (होलिस्टिक) विचार करणे सम्यक आकलनासाठी गरजेचे असते. तसे न केल्यास प्रतिक्रिया फक्त त्या त्या घटनेपुरत्याच राहतात आणि व्यापक चित्र (बिग पिक्चर) नजरेतून निसटू शकते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताविरोधात उचललेले आयात शुल्कवाढीचे पाऊल ही अशी एक घटना. तिची दखल तेवढी एकच घटना म्हणून घेणे आर्थिक शहाणपणाचा अभाव दर्शवते. तो धोका टाळून व्यापक चित्र नजरेत सामावून घ्यावयाचे असेल तर या आसपासच्या अन्य काही घटनांचा विचार आवश्यक. उदाहरणार्थ ट्रम्प यांच्या घोषणेनंतर दुसऱ्याच दिवशी 'मायक्रोसॉफ्ट' कंपनीचे बाजारमूल्य (मार्केट कॅप) चार लाख कोटी डॉलर्सचा टप्पा ओलांडते आणि त्याच वेळी तब्बल 600 हून अधिक भारतीय सूचिबद्ध कंपन्यांच्या गेल्या पाच वर्षांतील नफ्यात तब्बल 17 टक्के घट दिसून येते या घटना भिन्न परिप्रेक्ष्यात घडल्या असल्या तरी त्यांचा एकमेकांशी गाढ संबंध आहे. जगात चार लाख कोटी डॉलर्स बाजारमूल्याचा टप्पा ओलांडणारी मायक्रोसॉफ्ट ही फक्त दुसरी कंपनी. त्याआधी 'एनव्हिडिया' या संगणक चिप निर्मात्या कंपनीनेच फक्त ही भीमकाय कामगिरी नोंदवली. 'लोकसत्ता'ने 'आकार, अक्कल, आवाज' ( 11 जुलै) या संपादकीयातून 'एनव्हिडिया' कंपनीच्या या डोळे विस्फारक कामगिरीवर भाष्य केले होते. आता पाठोपाठ 'मायक्रोसॉफ्ट'नेही हे शिखर पार केले. अमेरिकेतील आघाडीच्या फक्त चार कंपन्यांचे बाजारमूल्य साधारण 15 लाख कोटी डॉलर्स भरते. त्याच वेळी जगात लवकरच तिसऱ्या वा दुसऱ्या क्रमांकावर झेप घेणार असलेल्या भारत देशाची अर्थव्यवस्था भरते जेमतेम तीन-साडेतीन लाख कोटी डॉलर्स इतकीच. म्हणजे आधी 'एनव्हिडिया' आणि आता 'मायक्रोसॉफ्ट' या एकेकट्या कंपन्यांची आर्थिक ताकद महासत्ता इत्यादी होऊ पाहणाऱ्या भारत देशाच्या अर्थक्षमतेपेक्षा अधिक आहे. भारतातील महत्त्वाच्या 'नायरा' या तेल कंपनीच्या तोंडास अगदी अलीकडे या 'मायक्रोसॉफ्ट'नेच फेस आणला होता, याचे स्मरण येथे सयुक्तिक ठरेल. त्यामागेही ट्रम्प हेच होते. अमेरिकी अध्यक्षांच्या दर्पाचा आधार काय हे कळावे, म्हणून हा मुद्दा विचारात घेणे आवश्यक. जगातील अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेपेक्षाही मोठ्या असलेल्या एकापेक्षा एक तगड्या कंपन्यांची अजस्रा आर्थिक ताकद दिमतीस असेल तर त्या देशाचे नेतृत्व करणाऱ्याच्या हलक्या डोक्यात हवा जाणे साहजिक. थोडक्यात ट्रम्प यांच्या मस्तवालपणाचे मूळ हे (तूर्त) अभेद्या आर्थिक ताकदीमध्ये आहे. म्हणून त्याच्या वर्तनाचा विचार करताना भावनावेगावर नियंत्रण गरजेचे. ते ठेवावयाचे असेल तर आपल्या देशातील 667 सूचिबद्ध कंपन्यांच्या ताज्या तिमाही निकालांतील तपशिलाचा विचार करणे उत्तम. या इतक्या कंपन्यांच्या सरासरी नफ्यात सरलेल्या तिमाहीत गेल्या वर्षीच्या जूनच्या तुलनेत जेमतेम 5.4 टक्के इतकी अत्यल्प वाढ नोंदली गेली. ही जून 2023 पासूनची विक्रमी मंदगती. तथापि गेल्या 20 तिमाहींचा, म्हणजे 60 महिने वा पाच वर्षे, विचार करु गेल्यास या कंपन्यांच्या नफ्यातील घट सणसणीत 17 टक्के इतकी भरते. गेल्या वर्षभरात या कंपन्यांचा महसूल अत्यंत मंदगतीने वाढत असून ही महसुली घट सरासरी तीन टक्के इतकी आहे. महसूलच वाढत नसेल तर नफ्याच्या अपेक्षेवर पाणी सोडावे लागणे ओघाने आलेच. ग्राहकांकडून मागणीत सातत्याने होत असलेली कपात हे आणि हे एकमेव कारण या अर्थगती मंदावण्यामागे आहे. अर्थविषयक वृत्तांकन क्षेत्रातील 'मनीकंट्रोल' ही वेबसाइट हा तपशील देते. रिलायन्स समूहाचा भाग असलेल्या 'नेटवर्क18' या वृत्तसेवा जालाची ही एक घटक. यावरुन ती 'अर्बन नक्षल', 'काँग्रेस टूलकिट' आदी कथित सरकारविरोधी विचारगटांचा भाग नाही, हे लक्षात यावे. याच वृत्तांकनातील तपशिलानुसार अर्थव्यवस्था खालपासूनच मंद झाल्याचे दिसते. म्हणजे हे संकट व्यापक आहे. जेव्हा मागणीच मंदावते तेव्हा पुरवठ्यात कितीही सुधारणा केली तरी काडीचाही फरक पडत नाही, हे ऐतिहासिक वास्तव पदोपदी दिसत असूनही ते पाहण्याचे धैर्य आपल्या अर्थव्यवस्थेचे सूत्रचालक दाखवत नाहीत, याचेच हे निदर्शक. त्याचमुळे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या ताज्या विधानाकडे लक्ष वेधणे योग्य ठरेल. गत सप्ताहात राजधानी दिल्लीत एका पुस्तक प्रकाशनात बोलताना त्यांनी खासगी गुंतवणुकीचा ओघ अजूनही सुरु न झाल्याचे अप्रत्यक्षपणे नमूद केले. खासगी गुंतवणूक वाढत नाही तोपर्यंत अर्थव्यवस्थेस गती देण्याची जबाबदारी सरकारवर येते. "सरकार हात सैल सोडण्यात मागेपुढे पाहणार नाही", असे सीतारामन म्हणाल्या. याचा अर्थ खासगी गुंतवणूकदार आपल्या मुठी बंद ठेवूनच आहेत असा होतो. ही गुंतवणूक वाढवावी असे आवाहन अर्थमंत्र्यांनी अर्धा डझन वेळा तरी केले असेल. खासगी क्षेत्राने स्पर्धक वृत्ती दाखवून द्यावी असे आवाहन दस्तुरखुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही अनेक वेळा करुन झाले. पण खासगी क्षेत्रास काही पाझर फुटताना दिसत नाही. अशा वेळी असे का होते या प्रश्नास भिडण्याचा प्रामाणिकपणा सत्ताधीशांनी दाखवायला हवा. तेथेच तर खरी मेख आहे. आपले सर्व काही उत्तम सुरु आहे, अशी एकदा स्वतःच स्वतःची धारणा करुन घेतली की परिस्थिती सुधारण्यासाठी काही करण्यासारखे उरत नाही. भरभरुन वाढणारा बाजारपेठ निर्देशांक, कंपन्यांच्या नवनव्या समभागांची वाढती मागणी आणि महादुकानांत गर्दी करणारा नवश्रीमंत वर्ग या पलीकडे वास्तव पाहण्याची सरकारची तयारी नाही. म्हणून ते दिसत नाही. पण जे दिसत नाही ते अस्तित्वातच नाही असे मानणे आत्मघाताकडे नेते. आंधळा भक्तगण आणि वैचारिक अपंग आनंददूत यांच्याकडे पाहून सर्व काही आलबेल असल्याच्या आभासात मग्न राज्यकर्ते हे अर्थव्यवस्थेच्या प्रगतीतील मोठाच अडथळा असतात. कसे ते आपण पाहात आहोत. गेल्या तीन आठवड्यांत आपले चलन अमेरिकी डॉलरच्या तुलनेत जवळपास अडीच रुपयांनी गडगडले आणि कृत्रिम बुद्धिमतेच्या झपाट्याने 'टीसीएस'सारख्या कंपनीवर आपल्या 12 हजार कर्मचाऱ्यांच्या हाती नारळ देण्याची वेळ आली. तशी ती आता अधिकाधिकांवर येईल. उमेदवारीच्या स्तरावर कर्मचारी भरतीची गरज दिवसेंदिवस कमी होत जाईल; कारण कृत्रिम बुद्धिमत्ता-धारित प्रणालीच्या साहाय्याने ही सर्व कामे मानवी गरजेशिवाय पूर्ण होतील. या सर्व चिंता, भीती काल्पनिक नाहीत आणि अतिरंजित तर अजिबातच नाहीत. हे सर्व वास्तवात येऊ लागलेले आहे. 'टीसीएस'ची नोकरकपात ही त्याची सुरुवात. अशा वेळी बाकी सर्व सोडून अर्थव्यवस्थेकडे आणि त्यातही रोजगार निर्मितीकडे कटाक्षाने लक्ष देणे अत्यावश्यक. विशेषतः डोनाल्ड ट्रम्प यांचे अमेरिकी वेडाचार वाढू लागलेले असताना आणि म्हणून निर्यातीस ग्रहण लागण्याची भीती असताना देशांतर्गत उद्योग विकासावर भर हवा. यातील आवश्यक पाऊल म्हणून अनेक तज्ज्ञ वस्तू-सेवा कराचे (जीएसटी) सुलभीकरण या प्रदीर्घ काळ प्रलंबित मुद्द्याचे उदाहरण देतात. गेले काही आठवडे या संदर्भात नुसती चर्चा सुरु आहे. या कर परिषदेच्या आगामी बैठकीत सुसूत्रीकरणास हात घातला जाईल, असे सांगितले जाते. पण हे आणि अन्य निकडीचे उपाय केव्हा केले जाणार हा प्रश्न. ते होतील तेव्हा स्वदेशी खरेदीचे आवाहनही करावे लागणार नाही. अशा वेळी पाकिस्तानला कसा धडा शिकवला, विरोधकांना कसे सरळ केले अशा नेहमीच्या यशोगाथांच्या आरत्या काही काळ बाजूस ठेवून अर्थव्यवस्थेची डागडुजी प्राधान्याने हाती घ्यावी. त्यासाठी नेहमीचे चीत्कार थांबवून सरकारातील धुरीणांनी या आर्थिक वास्तवाचा विचार आधी करावा. एरवी नेहमीचे यशस्वी खेळ आहेतच.

# फड मल्टीस्पेशलिस्ट हॉस्पिटल येथे बालयोगी ह भ प हरिहर महाराज दिवेगावकर यांची सदिच्छा भेट

परळी (प्रतिनिधी ) परळी शहरातील फड मल्टीस्पेशलिस्ट हॉस्पिटल शिवाजी चौक परळी अंबाजोगाई रोड येथील हॉस्पिटल डॉ. पांडुरंग गंगाधर फड साहेब यांच्या हॉस्पिटलला बालयोगी विद्यावचनस्पती ज्योतिष भूषण ह .भ. प. भागवताचार्य रामायणाचार्य हरिहर महाराज दिवेगावकर यांनी सदिच्छा भेट देऊन आशीर्वाद देण्यात आले यावेळी फड मल्टीस्पेशालिस्ट हॉस्पिटलचे सर्वेसर्वा डॉ. पांडुरंग फड, डॉ. सौ शुभांगी पांडुरंग फड -मुंडे, डॉ. सिद्धेश्वर फड यांच्या वतीने डॉ फड साहेबांनी ह भ प हरिहर महाराज दिवेगावकर यांना संपूर्ण आहेर देऊन सन्मानित करण्यात आले.



यावेळी संत पूजनाचा सोहळा भक्तीभावाने पार पाडण्यात आला आशीर्वाद रुपी ह भ प बालयोगी हरिहर महाराज दिवेगावकर यांनी हॉस्पिटल मधील सर्व सुविधाची पाहणी करून सर्व सुविधायुक्त असे हॉस्पिटल आपल्या परळी शहरात रुग्णांची सेवा करण्यासाठी डॉ. फड साहेबांना त्यांनी आशीर्वाद दिले व रुग्णांची उत्तरोत्तर सेवा घडावी अशी प्रार्थना करण्यात आली फड हॉस्पिटलच्या वतीने ह भ प बाल योगी हरिहर महाराज दिवेगावकर यांचे यांनी आशीर्वाद देण्यात आले .

ह भ प बालयोगी हरिहर महाराजांनी डॉ साहेबांबद्दल सांगितले मी हॉस्पिटलच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित राहूनही आशीर्वाद दिले त्यावेळी अगदी गोरगरीब जनतेची आदराने थोरा मोठ्यांचा मान ठेवून त्यांची आपुलकीने विचारपूस करत अत्यंत अल्प दराने पेशंटला उपचार करून बरे करणारे व वारकरी संप्रदायावर अत्यंत निष्ठा श्रद्धा ठेवून साधू संतांची सेवा करणारे आदर्श डॉ. पांडुरंग फड साहेब यांच्या सारखे डॉक्टर समाजात असल्यामुळे पेशंट लवकरात लवकर पूर्ण पणे बरे होतात आणि त्यांच्या मनात डॉक्टर विषयी आदराची भावना व्यक्त होते असे महाराजांनी सांगितले यावेळी फड मल्टी स्पेशालिस्टच्या वतीने वारकरी संप्रदायातील महाराज गायक वादक सर्व गुणी जनांचा आदर सत्कार करण्यात येणार असे म्हणाले.

# बालासाहेब फड यांना नाशिक येथे न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने वंजारी समाजरत्न पुरस्कार जाहीर

नाशिक( प्रतिनिधी) न्यू विकलांग बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र राज्य संचलित वर्धापन दिन निमित्त वंजारी समाजरत्न पुरस्कार 2025 चे आयोजन रविवार दिनांक 10 ऑगस्ट 2025 रोजी सकाळी अकरा वाजता संपन्न होणार आहे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री मा. नामदार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, माजी मंत्री श्री धनंजय मुंडे साहेब , माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे ,माजी आ. गोविंद केंद्रे, ह भ प डॉ. तुळशीरामजी गुट्टे महाराज, श्री अनिल गर्जे,श्री .कोंडाजी मामा आव्हाड, उद्योजक बुधाची दादा पानसरे, माजी मंत्री खा. भागवतराव कराड, श्री. मोहन दादा घुगे, कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ह भ प प्रकाश महाराज साठे, ह भ प सोपान महाराज शास्त्री आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाचे स्थळ क्रांतिवीर श्रावण नाईक शिक्षण प्रसारक संस्था, शरणपुर रोड,कॅनडा कॉर्नर नाशिक येथे कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन कार्यक्रमाच्या संयोजक बाळासाहेब घुगे,स्वागताध्यक्ष: यमुनाताई घुगे अध्यक्ष न्यू विकला बहुउद्देशी सेवाभावी संस्था यांनी केले आहे. या पुरस्काराचे मानकरी



पुरस्कारथी आदर्श पुरस्कार 1)बालासाहेब फड : तालुकाध्यक्ष महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई,संपादक दैनिक सोमेश्वर साथी परळी वैजनाथ 2) नितीन ढाकणे दैनिक अतुल्य महाराष्ट्र3) नरहरी उंबरे दैनिकपुण्यनगरी,मनमाड4). विलास माधवराव ढाकणे दैनिक देशदुत, दिंडोरी5) रामनाथ ढाकणे टिव्ही 9 मराठी जालना7) अरुन खरमटे दैनिक बाळकडू 8) संभाजी मुंडे टीव्ही 9 परळी वैजनाथ 1). ह भ प अँड युवा किर्तनकार अस्मिताताई सांगळे सत्येगावकर 2) विठ्ठल कांगणे सर आदर्श शिक्षक 3) सागर सानप आदर्श शिक्षक व सागर क्लासेस 4)कांतीलाल सुदामराव बोडके (आदर्श सरपंच - दारणा सांगवी) 5) वसंतराव मुरलीधर धात्रक (आदर्श शिक्षक) 6. लक्ष्मण एकनाथ गोमासे (बांधकाम व्यावसायिक)7.गोविंद घुगे (आदर्श समाज सेवक) 8. शिवाजी नबाजी ऊगले (ट्रान्सपोर्ट व्यवसायिक) 9. बाळनाथ देवराम घुगे (आदर्श शिक्षक) 10. विठोबा राजे फडे (राजकीय) 11. सचिन कोंडाजी शेळके (प्रशासन) 12 काशिनाथ बाबुराव मुंढे (आदर्श मुख्याध्यापक) 13. जगन आप्पा कुंटे (समाजसेवक) 14. डॉ आनंदा सानप (प्रसिध्द डॉ) 15. अँड. रमेश काळे, दापुर 16. भास्कर आव्हाड (कुषी अधिकारी- निफाड) 17 दता बबनराव सोनवणे (आदर्श सरपंच गोंदे) 18 अजय विष्णू आघाव राजकीय व सामाजिक क्षेत्रात ) 19गोरख कारभारी घुगे (देशसेवा) 20. संदिप बबन नांगरे (राजकीय) 21गणपतराव हाडपे (जेष्ठ समाजसेवक) 22आदिती प्रकाश गायकवाड (आदर्श समाजसेविका) 23. डॉ सुनील सांगळे पंचवटी वैद्यकीय सेवा 24 योगेश भास्करराव कातकाडे (समाजसेवक, कर सल्लागार) 25प्रकाश सानप (युवा उद्योजक) 26. मारुती मुंडे (दिव्यांग सेवक - 27) विजय सोनवणे, मॅनेजमेंट कौन्सिल मेंबर तसेच सिनेट सदस्य,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ 28) तुषार फड युवा उद्योजक व सामाजिक 29) प्रा.राजाराम खाडे सर समाजसेवक 30), अश्विनी तिडके क्राईम ब्रँच 31)किरण नागरे पोलिस प्रशासक 32) अनिकेत मुंडे पोलिस 33) सुमनताई सोनवणे मा नगरसेविका 34) नारायण काकड सामाजिक सेवा 35) रामदास आव्हाड उपायुक्त वित्त व अर्थ मुंबई महानगरपालिका प्रशासकीय 36) माणिक घुगे भगुर लाहुरी आदी मान्यवर पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे पुरस्काराचे स्वरुप ट्रॉफी सन्मानपत्र पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन न्यू दिव्यांग विकलांग बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र राज्य, अध्यक्ष बाळासाहेब घुगे न्यू विकलांग बहुउद्देशी सेवाभावी संस्थेच्या अध्यक्ष सौ यमुनाताई घुगे संकेत सानप आदी मान्यवरांनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी अॅक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

वाघमारे यांनी म्हटले आहे.

-----------------------------------------

ठाकरे हेही असणार आहेत. हे दोन्ही नेते राहुल गांधी यांची वैयक्तिक भेटही घेणार आहेत. राहुल गांधींकडून उद्धव ठाकरेंना जेवणाचं निमंत्रण देण्यात आलं आहे, त्यासाठी आम्ही दिल्लीला जात आहोत अशी माहिती आदित्य ठाकरेंनी दिली आहे.समोर आलेल्या माहितीनुसार येत्या 7 ऑगस्ट रोजी इंडिया आघाडीच्या नेत्यांची बैठक होणार आहे. या बैठकीपूर्वी, उद्धव ठाकरे आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यात फोनवर चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. यात दोघांमध्ये बैठकीच्या रणनीतीवर आणि संभाव्य विषयांवर चर्चा झाल्याचे बोलले जात आहे. सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका समोर आहेत, त्यामुळे या बैठकीला महत्व प्राप्त झाले आहे.इंडिया आघाडीच्या बैठकीत महाराष्ट्रातील राजकारणावर चर्चा होण्याची शक्यता आहे. यात जागावाटपाचा मुद्दा महत्वाचा असणार आहे. त्याच बरोबर शिवसेना ठाकरे गट आणि मनसेच्या युतीबाबत चर्चा होण्याची शक्यता आहे. त्याबरोबर आगामी निवडणूकीत भाजपविरोधी वातावरण तयार करण्यासाठी काय करावे लागेल याबाबतही चर्चा होणे अपेक्षित आहे.6 ऑगस्ट रोजी उद्धव ठाकरे दिल्लीत पोहोचतील. त्यानंतर ते संजय राऊत यांच्या निवासस्थानी पोहोचणार आहेत. 6 ऑगस्ट रोजीच्याच संध्याकाळी उद्धव ठाकरे शरद पवार यांची भेट घेणार आहेत. त्यानंतर ते 6 ऑगस्ट रोजी रात्री उशिरा पक्षाच्या सर्व खासदारांची बैठक घेणार आहेत. 7 ऑगस्ट रोजी खासदार संजय राऊत यांच्या निवासस्थानी ते पत्रकार परिषद घेतील. त्यानंतर सकाळी 11 वाजता संसदेतील पक्ष कार्यालयाला भेट देतील. दुपारी ते राजकीय गाठीभेटी घेतील. 7 ऑगस्ट रोजी राहुल गांधी यांनी आयोजित केलेल्या डिनर आणि इंडिया आघाडीच्या बैठकीला उपस्थित राहतील

-----------------------------------------

स्तरांतून उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असून, यंदाच्या बँक निवडणुकीत परिवर्तन अटळ असल्याचे दिसून येत आहे.

मंगळवारी सोनपेठ, पाथरी, माजलगाव तसेच धारूर, वडवणी तालुक्यातील सभासद मतदारांच्या परिवर्तन पॅनलच्या उमेदवारांनी गाठीभेटी घेतल्या. यावेळी उमेदवारांसोबत सोनपेठचे माजी आमदार व्यंकटराव कदम, माजलगाव चे माजी आमदार राधाकृष्ण विखे पाटील, रावसाहेब राठोड सतीश कुंडगीर, बाळासाहेब गव्हाणे, बाबू पवार, परमेश्वर साखरे, रमेश महात्मे, विलास दारकुंडे, मुंजाभाऊ जाधव, लिंबाजी इंगळे, कृष्णा फफाळ, तालुकाध्यक्ष युवराज लगड, वडवणी तालुका अध्यक्ष जमाले पाटील, राष्ट्रवादी प्रवक्ते श्रीराम मुंडे, माजी तालुकाध्यक्ष सुरेश भोर, गणेश थोरात युवा तालुकाध्यक्ष धारूर, बाळासाहेब नखाते, मिनिनाथ दादा फड, माधवराव मुंडे, रामकृष्ण फड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. परळीसह जिल्हाभरातील आणि इतर जिल्ह्यातील मतदारांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून वैद्यनाथ बँक निवडणुकीत परिवर्तन वैद्यनाथ पॅनलचा विजय अटळ असल्याचे सर्व नेतेमंडळींनी म्हटले आहे.

-----------------------------------------

येत्या रविवार दि. 10 ऑगस्ट रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीत लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलचे उमेदवार माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे, सौ. माधुरी मेनकुदळे, अनिल तांदळे, प्रा. विनोद जगतकर हे चारजण बिनविरोध निवडून आले आहेत. तर 13 जागांवर विद्यमान अध्यक्ष विनोद सामत, उपाध्यक्ष रमेशराव कराड, विजयकुमार वाकेकर, अमोल डुबे, कुलभूषण जैन, प्रकाश जोशी, डॉ. राजाराम मुंडे, संदीप लाहोटी, प्रवीण देशपांडे, माहेश्वर निर्मळे, राजेंद्र लोमटे, सुशांत लोमटे, मनमोहन कलंत्री हे उमेदवार आहेत. आज लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या प्रचारासाठी भजपा - राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) - शिवसेना (शिंदे) महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी शहरात भव्य प्रचार फेरी काढली. या फेरीचा शुभारंभ गणेशपार येथील श्री गणेशाला श्रीफळ वाढवून करण्यात आला. यानंतर गणेशपार, उखळवेस, भिमनगर, नांदूरवेस, गोपनपाळे गल्ली, अंबेवेस, देशमुख गल्ली, देशमुख पार, नेहरू चौक आदी भागात जाऊन कार्यकर्त्यांनी मतदारांच्या भेटी घेऊन लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या उमेदवारांनाच मतदान करण्याचे आवाहन केले.

या प्रचारफेरीत भाजपाचे जेष्ठ नेते दत्ताप्पा इटके, विकासराव डुबे, वैजनाथ जगतकर, श्रीराम मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार), वैजनाथ सोळंके, बाजीराव धर्माधिकारी, सुरेश टाक, उमेदवार प्रकाश जोशी, अनिल तांदळे, प्रा. विनोद जगतकर, योगेश मेनकुदळे, यांच्यासह राजेंद्र ओझा, महादेव इटके, राजेंद्र सोनी, उमेश खाडे, अश्विन मोगरकर, अनिश अग्रवाल, बालासाहेब कराळे, वासुदेव पाठक, , सुशील हरंगुळे, शफिया इनामदार, अनिल आष्टेकर, सौ. चित्रा देशपांडे, सौ. चंदाताई ठोंबरे, श्रीमती बोडखे, दत्ताभाऊ सावंत, योगेश जाजू, मोहन जोशी, नितीन समशेट्टी, संतोष सामत, सय्यद सिराज, संजय देवकर, वैजनाथ रेकने, श्रीपाद शिंदे , लाला खान, जितेंद्र मस्के, भागवत गिते, गोविंद वाकेकर, विलास जुनाळ, रमेश मस्के, एजाजभाई, बालाजी घोडके, शेख खदीर, सचिन स्वामी, यश लाहोटी, अजय डुबे, जगदीश मंत्री, मुकेश पाटील आदींसह भजपा - राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) - शिवसेना (शिंदे) महायुती आणि महायुती प्रचार समितीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------------------------------------

मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

बीड जिल्ह्यातील इलेक्ट्रॉनिक मीडियातील एक नावाजलेले नाव म्हणजे संभाजी मुंडे अगदी सुरुवातीच्या काळात आपल्या ग्रामीण भागाच्या बातम्या इलेक्ट्रॉनिक मिडिया तुरळक बातम्या प्रसारित करत होता तेव्हा पासून आज तागायत इलेक्ट्रॉनिक मिडिया मध्ये सुरुवातीला कॅमेरामन म्हणून ओळख आणि आता थेट टिव्ही 9मराठी या माध्यमाच्या प्रतिनिधी म्हणून केले काम आपल्या पत्रकारिता क्षेत्रात संभाजी मुंडे यांनी समाजावर होणारे अत्याचारा विरुद्ध प्रसिद्ध, न्यायाच्या भावनेतून केलेली पत्रकारिता याचीच दखल

यू विकलांग बहुउद्देशीय संस्थेने घेऊन त्यांना यंदाचा वंजारी समाजरत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला असून या योग्य निवडीचे सर्व स्तरावर स्वागत करत अभिनंदनाचा श्री मुंडेवर होत आहे.

-----------------------------------------

प्रमुख, बुथप्रमुख, प्रमुख नेते व कार्यकर्त्यांची बैठक झाली. यात प्रचार, वैयक्तिकरित्या मतदारांपर्यंत पोचण्यासाठी रणनीती, मतदार यादी वाचन, विभागवार मतदार यादी वितरण, सोशल मीडियावर प्रचार आदी विषयावर सखोल चर्चा करण्यात आली. पदाधिकारी व कार्यकर्त्याच्या अनेक सूचना बँकेच्या निवडणूक मॅनेजमेंट टीम पर्यंत पोचवण्याचा निर्णय झाला.

यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, वैद्यनाथ बँकेने सभासदांच्या विश्वासावर यशोशिखर गाठले आहे. ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेचे संचालक मंडळ अतिशय चांगले काम करीत आहे. या निवडणुकीतही ना. पंकजाताई मुंडे यांनी अनुभवी, व्यापारी आणि सर्वसमावेशक असे उमेदवार दिले आहेत. त्यामुळे लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनल चा विजय निश्चित आहे मात्र कार्यकर्त्यांनी प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचून भूमिका विषेध करावे आणि जास्तीत जास्त मतदान करून घ्यावे असे आवाहन करून बँकेच्या सभासदांनी कोणाच्याही भूलथापांना बळी न पडता लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या उमेदवारांना प्रचंड मताने विजयी करावे असे आवाहन उमाताई समशेट्टे यांनी केले.

बैठकीस शहराध्यक्षा उमाताई समशेट्टे, जेष्ठ नेते बालासाहेब कराळे, उपाध्यक्ष महादेव ईटके, सरचिटणीस अश्विन मोगरकर, उपाध्यक्ष प्रशांत कराड, चिटणीस वैजनाथ रेकणे, अनिस शेख, कोषाध्यक्ष अनिष अग्रवाल, युवमोर्चा अध्यक्ष सुशील हरंगुळे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष विजय दहिवाळ, अनु. जाती मोर्चा अध्यक्ष राहुल घोबाळे, अल्पसंख्याक मोर्चा अध्यक्ष समी भाई, जेष्ठ नेते अच्युत जोगदंड, नरेश पिंपळे, उमेश निळे, अनिस कुरेशी, खदीर भाई, दिलीप नेहरकर, , श्रीपाद शिंदे, दिनेश आंधळे, योगेश मुंडे विराज गित्ते, श्रीमंत तोडकरी, रवी देशमुख उपस्थित होते.

-----------------------------------------

## पान 4 वरुन

समी शेख यांची भाजप अल्पसंख्याक मोर्चा परळी शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.या नियुक्तीबद्दल पक्षातील तसेच समाजातील लोकांनी समी भाई शेख यांचे अभिनंदन केले आहे आणि त्यांच्या भावी राजकीय कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या प्रसंगी समी भाई शेख यांनी अभिनंदन करणाऱ्या सर्वांचे मनापासून आभार मानले आहेत. व माझ्या सारखे सामान्य कार्यकर्त्यांवर विश्वास टाकल्या बद्दल राज्याच्या पर्यावरण मंत्री मा.ना. पंकजाताईसाहेब व शहर अध्यक्षा उमाकाकू समशेट्टि यांचे आभार मानले. या पदाचा उपयोग भारतीय जनता पार्टीची ध्येय धोरणे, विचार सब का साथ सब का विकास सब का विश्वास सर्व सामान्य जनतेपर्यंत पोचवण्यासाठी व पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी नव्या जबाबदारीसह काम करीत राहील असा विश्वास समी शेख यांनी व्यक्त केला आहे

-----------------------------------------

यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

कार्यक्रमाला रामदादा किरवले, प्रमोद भाऊ किरवले, मधुकर नाना किरवले, सचिन रणखांबे, विलास बनसोडे, गायसमुद्रे बप्पा, डॉ. महेंद्र उजगरे, बाबासाहेब किरवले तसेच अनेक उपासक व उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------------------------------------

19 गुंठे जमीन सुमारे 24 कोटी 50 लाख रुपयांना खरेदी केली होती. या व्यवहारात अंबाजोगाईतील जलील नियाजोद्दिन शेख, शोएब आयुब कुरेशी, जिलानी बशीर कुरेशी, अनुप ललितमोहन जाजू, कुलदीप किशोर परदेशी, ईजाज फतरु अली आणि फेरोज अब्दुल सत्तार सहभागी होते. व्यवहारात जमिनीचे एन.ए. (नॉन-ॲग्रिकल्चरल) रुपांतर दोन महिन्यांत करण्याचे ठरले होते. मात्र, ठरलेल्या वेळेत रुपांतर न झाल्याने भागीदारांमध्ये वाद निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर शोएब कुरेशी व अनुप जाजु यांनी जावेद शेख यांना वारंवार फोन करुन धमक्या दिल्या, असे फातेमा शेख यांनी तक्रारीत नमूद केले आहे. त्यामुळे जावेद शेख यांनी माजेद इनामदार यांची अंदाजे 3 कोटी रुपयांची जमीन शोएब कुरेशी व अनुप जाजु यांच्याकडे तारण म्हणून 4 जानेवारी 2025 रोजी नोटरी करुन दिली होती.

रविवारी (3 ऑगस्ट) रात्री 10 वाजता राजीव गांधी चौकातील सुदर्शन धोत्रे यांच्या कार्यालयात प्रॉपर्टी संदर्भात बैठक झाली. बैठकीला जावेद शेख, शोएब कुरेशी, अनुप जाजु, माजी नगरसेवक दिनेश भराडिया, सचिन जाधव, सुदर्शन धोत्रे व वसीम कुरेशी उपस्थित होते. या बैठकीत जावेद शेख यांना शिवीगाळ व जीवे मारण्याच्या धमक्या देत तारण ठेवलेल्या मालमत्तेची नोंदणी करण्यासाठी दबाव टाकण्यात आला. या वादामुळे जावेद शेख यांना तीव्र तणाव व घाम येऊ लागला. छातीत कळ येत असल्याचे त्यांनी सांगितले आणि रुग्णालयात फातेमा शेख यांच्या तक्रारीवरुन शोएब कुरेशी, अनुप जाजु, माजी नगरसेवक दिनेश भराडिया, सचिन जाधव आणि सुदर्शन धोत्रे या पाच जणांविरुद्ध बीएनएस कलम 105, 352, 351(2), 351(3) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर कांबळे करत आहेत.

-----------------------------------------

गायकवाड, उपाध्यक्ष -गजानन चलोदे, सचिव -गौरव राऊत, कोष्याध्यक्ष -नितीन झिरपे यांची निवड करण्यात आली.

शहरातील कीर्तीनगर येथील प्रतिवर्षाप्रमाणे गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणारा जय भवानी गणेश मंडळाच्या वतीने यंदा मार्गदर्शक तथा आयोजक श्रीनिवास राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार असल्याची माहिती आयोजीत करण्यात आलेल्या बैठकीत यावेळी यंदाचे अध्यक्ष महेश गायकवाड यांनी दिली. श्रीनिवास राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या 30 वर्षापासून सामाजिक उपक्रम घेऊन मोठ्या ऊत्साहात साजरा करण्यात येतो. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. "गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून समाज प्रबोधन व एकोप्याचा महत्त्वाचा माध्यम आहे. आगामी काळात मंडळाच्या वतीने अधिकाधिक समाजोपयोगी उपक्रम हाती घेतले जाणार आहेत. गणेश मंडळाच्या माध्यमातून गेल्या 30 वर्षापासून अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत. श्रीनिवास राऊत यांच्या कुशल संकल्पनेतून विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांनी गणेश उत्सवाला सांस्कृतिक व सामाजिक कार्याची जोड देवून जय भवानी गणेश मंडळ शहरात लक्ष वेधी उपक्रम राबविते असतात. या बैठकीस चेतन शिंदे अमोल गायकवाड मुकुंद आंधळे उत्तरेश्वर बहिरे सचिन गिराम भागवत मोरे सिधु शेटे सौरभ मोदानी राजेश अंधारे यश बिडगर श्रीनाथ राऊत माऊली मोरे अश्विन कचरे बापू शिंदे अनुराग पाथरकर व गणेशभक्त व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------------------------------------

मार्गदर्शनाखाली कामाला लावले जाणार आहे. त्यांना प्राथमिक उपचाराचे प्रशिक्षण, माहितीपुस्तिका व औषधपेट्या दिल्या जातील. गोपीनाथ मुंडे महामंडळाच्या योजना जनतेपर्यंत:महामंडळाच्या सर्व योजना एका माहिती पुस्तिकेद्वारे मजुरांपर्यंत पोहोचवल्या जाणार आहेत.टोल-फ्री क्रमांक सुरु:

स्थलांतरदरम्यान मजुरांना येणाऱ्या अडचणींसाठी नवीन टोल-फ्री हेल्पलाईन सुरु केली जाणार आहे.

100% ओळखपत्र वितरण:

बीड जिल्ह्यातील सर्व मजुरांची ग्रामपंचायत स्तरावर ओळखपत्रांसाठी नोंदणी करण्यात येणार आहे, ज्यामुळे सरकारी योजनांचा लाभ मिळवणे सुलभ होणार आहे.संपूर्ण योजनांचा लाभ 'सॅच्युरेशन' पद्धतीने:आयुष्यमान भारत कार्ड, घरकुल योजना, रेशन कार्ड आदी महत्त्वाच्या योजनांचा लाभ प्रत्येक नोंदणीकृत मजुराला मिळणार आहे.Whatsapp ChatBot सेवा:घरकुल योजनेसंबंधित तक्रारी निवारणासाठी विशेष Whatsapp ChatBot सेवा सुरु केली जात असून त्याचा शुभारंभ पालकमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे या कार्यक्रमात जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत महिलांना औषधपेट्यांचे वाटप करण्यात येणार आहे.

या ऐतिहासिक उपक्रमासाठी ऊसतोड कामगार, मुकादम, वाहतूकदार, स्वयंसेवी संस्था आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाबाबत महाराष्ट्र राज्य ऊसतोड कामगार मुकादम वाहतूक संघटनेचे राज्य संघटक मा. बापासाहेब भांगे यांनी सर्व संबंधितांनी उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

-----------------------------------------

ही आवश्यकता नाही. अशा ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या परवानगीने पारंपारिक लघुकत्तलखाने सुरु करता येऊ शकतात. तसेच त्या ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थेने जनतेचे आरोग्य स्वच्छता आणि जनावरांच्या कत्तलीसंदर्भात आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी आहे.

गेल्या काही वर्षापासून आमच्या व्यवसायाला बेकायदेशीर समजून अडथळे निर्माण केले जात आहेत. तरी वस्तुस्थिती आणि शासनाच्या नियमांचा वापर करुन एक छोट्या स्वरुपाचा लघुकत्तरखाना सुरु करण्यास परळी नगर परिषदेने परवानगी द्यावी जेणेकरुन आरोग्य विषयक नियमांचे पालन होईल व व्यापाऱ्यांवर अन्याय होणार नाही. यासाठी लवकरात लवकर ठोस निर्णय घेण्याची विनंती कुरेशी संघटनेने केली आहे.

या निवेदनावर कुरेशी संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष कादर कुरेशी, परळी अध्यक्ष महबूब कुरेशी, परळी तालुका अध्यक्ष फैजल कुरेशी, यांच्यासह आलीशेर कुरेशी, जामीन रशीद कुरेशी, निसार कुरेशी, अफरोज कुरेशी, शहबाज कुरेशी, तारेख कुरेशी, मुख्तेद कुरेशी, शहनवाज कुरेशी, ताहेर कुरेशी, मुजफ्फर कुरेशी आदींच्या स्वाक्षरी आहेत.

-----------------------------------------

सांगत देश्यातील गरिबी व श्रीमंत यांच्यातील दरी संपल्याखरच देश स्वातंत्र्य म्हणता येईल श्री संजय वाघमारे सर त्यांच्या भाषणात म्हणाले

अण्णाभाऊ साठे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवरचा पोवाडा सर्वप्रथम रशियामध्ये गायला. त्यांनी देशाबाहेर जाऊन शिवाजी महाराजांवर पोवाडा सादर करण्याची ऐतिहासिक कामगिरी केली तसेच

' फकीरा ' ही गाजलेली कादंबरी अण्णाभाऊंनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या झुंजार लेखणीला अर्पण केली. यातुन आपणास दिसुन येते की डॉक्टर बाबासाहेबांचे विचार पुढे घेऊन जाऊ असा समाजाला संदेश दिलेला आहे जग बदल घालुनी घाव मज्ञा सांगुन गेले भीमराव हा याचा सार आहे या कार्यक्रमाचा अध्यक्ष समारोप कानिफनाथ माध्यमिक विद्यालयाचे मुख्याधापक श्री डी. बी. सोळंके यांनी अण्णाभाऊ साठे यांनी गरिबीवर मात केली व त्या काळातील व्यवस्थेमुळे त्यांना पुर्ण शिक्षण घेता आले नाही तरीही हार ना मानता त्यांनी 37 कादंबऱ्या, 11 कथासंग्रह, 11 लोकनाट्य 7 चित्रपट कथा, 2 नाटक इत्यादीचे साहित्य लिहिले असे सांगत अध्यक्ष समारोप केला

या कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक विभागाचे श्रीमती सुचिता डाके मॅडम कल्याण व्हरकटे सर श्रीमती काळदाते मॅडम , बी. सी. क्षिरसागर ,अशोक व्हरकटे सर ,ज्ञानेश्वर सोळंके ,केरबा उजगरे ,डावकर सर ,तंबुड सर यांनी सहकार्य केले.

-----------------------------------------

भावनेने संगितमय सेवा देत आहेत. या रामायण महाप्रसादाचे यजमान अनिता सुनील मालानी यांच्याकडे असून त्या प्रसंगी प्रभू रामचंद्रजीचे प्रसंगानुसार देखावे करण्यात येत आहेत. प्रत्येक दिवशी देखाव्या नुसार लहान मुलांची सजावट करून अतिशय भक्तीमय व आनंदी वातावरण पाठाचे संगीतमय मधुर वाणीतून भक्तांना श्रवन करण्यास येत आहे. रामायणामधील त्याग, सदाचाराचे शिक्षण मिळत आहे. 6 ऑगस्ट 2024 पर्यंत हे पारायण चालू राहील जास्तीत जास्त भाविक भक्तांनी या रामायण पाठाचा लाभ घ्यावा असे आवाहन माहेश्वरी महिला मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

-----------------------------------------

दिले. गायरान धाराकांना एक तर मोबदला द्या किंवा बेकायदेशीर झालेले जमिनीवरील अधिग्रहण रद्द करा अशी विनंती यावेळी तहसीलदार यांना करण्यात आली. गोरगरीब दलित लोक गेल्या तीस वर्षापासून गायरान जमिन खात होते, त्यांचा उदरनिर्वाह त्याच गायरान जमिनीवर अवलंबून होता, पण ती जमीन खाली करुन गरिबांच्या तोंडातला घास ओढवून घेणारे संबंधित अधिकारी, सरपंच, तलाठी आणि सर्वच अधिकारी यांच्यावर ॲट्रॉसिटी नुसार गुन्हे दाखल करण्याचीही यावेळी डॉ. जितीनदादा वंजारे खालापूरीकर यांनी मागणी केली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. जितीनदादा वंजारे खालापूरीकर, वंचितचे तालुकाध्यक्ष दिलीप माने, सावता परिषदेचे तालुकाध्यक्ष विष्णू जाधव, तालुका सचिव सचिन येनकुळे, जिल्हा उपाध्यक्ष चंदू औसरमल, पप्पू उगले इत्यादी उपस्थित होते. यावेळी वंचितचे तालुकाध्यक्ष दिलीप माने यांनी हा मुद्दा न लावून धरल्यास मोठ आंदोलन उभा करु असे सांगितले आणि सावता परीशदेचे तालुकाध्यक्ष विष्णू जाधव यांनीही खंडागळे कुटुंबियांना न्याय नाही मिळाल्यास आंदोलन करण्याचा ईशारा दिला.

-----------------------------------------

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, एस. एम. युसुफ, डॉ. गणेश ढवळे, माजी सैनिक अशोक येडे, लक्ष्मण चाटे ,शेख युनुस, शेख सादिक, आजम खान, रामधन जमाले, डॉ. लक्ष्मण पवळ, सुदाम कोळेकर, शेख मुबीन, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे आणि या प्रश्नाकडे लेखणीच्या माध्यमातून लक्ष वेधणारे सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे व मुक्तपत्रकार एस. एम. युसूफ यांनी लागोपाठ तीन वर्ष महात्मा गांधी यांच्या 2 ऑक्टोबर या जयंती दिनी या चौकात लक्षवेधी आंदोलन ही केले होते. याची दखल घेऊन तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांनी या चौकात माकडांच्या नवीन प्रतिकृतीसह सीसीटीव्ही कॅमेरे, पथदिवे लावण्यात यावे असे बीड नगर परिषद मुख्याधिकारी यांना आदेशित केले होते.

याची दखल घेऊन तत्कालीन मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी तातडीने पाऊल उचलले आणि नासधूस करण्यात आलेल्या माकडांच्या प्रतिकृती हटवून महात्मा गांधीजींच्या जयंतीदिनी म्हणजेच 02 ऑक्टोबर 2024 रोजी माकडांच्या नवीन प्रतिकृती बीड नगर परिषदच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्याहस्ते बसवल्या. त्यानंतर सीसीटीव्ही कॅमेरेही लावले आणि नुकतेच आता सोलार प्लेट तसेच पथदिवे ही लावल्याने या चौकाचे सुशोभीकरण चांगले झाले आहे. या चौकाला महात्मा गांधी चौक नाव देण्याबाबतही त्यांना निवेदन देण्यात आले होते. याबाबतही त्यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून याबाबतचा प्रस्ताव लवकरच जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवण्याची ग्वाही दिली होती. बीड नगर परिषदच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी या चौकाचे सुशोभीकरण केल्याने तसेच तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ - मुंडे यांनी याकरिता आदेशित केले होते म्हणून दोन्ही महिला अधिकाऱ्यांचे प्रत्यक्ष भेटून पुष्पगुच्छ देऊन हृदयी आभार सुद्धा व्यक्त केले होते. नंतर बीड शहरातील विविध समस्ये बाबत, नगरपरिषद अनागोंदी कारभार, प्रशासकीय कारभार, आर्थिक अनियमीतता, विविध चौकशी आदी बाबत बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेच्या वतीने बीड नगरपरिषदेच्या तत्कालीन मुख्याधिकारी नीता अंधारे यांना वारंवार लोकशाही मार्गाने आंदोलन करुन निवेदन दिलेले आहेत. नंतरच्या काळात विविध मागण्याच्या निवेदनास केराची टोपली दाखवून बीड शहरातील विविध समस्येकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून आले. नीता अंधारे यांची धाराशिव नगर परिषदेमध्ये मुख्याधिकारीपदी दि. 1ऑगस्ट 2025 रोजी नियुक्ती केली आहे . नांदेड जिल्हातील मुदखेड नगर परिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे लवकरच बीड नगरपालिकेचा कारभार हाती घेतील. त्यांनाही शहरातील समस्येविषयी तसेच विविध मागण्या विषयी बीड जिल्हा सामाजिक कार्यकर्ता संघटनेच्यावतीने अवगत करुन देण्यात येईल. त्यांच्याकडून चांगल्या कर्तव्यदक्ष कामाची आपण सर्वजण अपेक्षा करूया.

-----------------------------------------

हेच शिवपुराण सांगते या शब्दांत महाराजांनी भाविक भक्तांना संबोधित केले.

जंगल मे मंगल असं म्हणत डोंगराळ प्रदेशावर असलेल्या धुनकेश्वर मंदिराच्या दैवताचे कौतुक सुरुवातीलाच महाराजांनी करत भक्तांच्या नवसाला पावणारं दैवत असल्याचं त्यांनी सांगितलं. श्रावण दुसऱ्या सोमवारी श्रावण सोमवार महोत्सव समितीच्या किर्तन सेवा आणि महाप्रसाद ज्यात सर्व ग्रामस्थांचा सहभाग होता. एवढ्या डोंगरकुशीवर वास्तव्य करणाऱ्या धुनकेश्वराला जमलेली गर्दी पाहून बारा ज्योतिर्लिंगासारखे स्वरुप असल्याचेही महाराज म्हणाले. बीड जिल्हा वारकरी संतांची भुमी असुन रामायणाच्या काळात लंका शोधीसाठी निघालेल्या प्रभु रामचंद्राचे पाय भुमिला लागल्याने पवित्रता व्यापक असल्याचे ते म्हणाले. किर्तन सेवेसाठी भाविक बसतात तेव्हा मन शुद्धीकरण करून किर्तन सेवन केले तरच आत्मोद्धार होवु शकतो. अन्यथा यायचं म्हणुन यायचं आणि बसायचं म्हणुन बसायचं हा भक्तिमार्ग नसल्याचे त्यांनी सांगितले. अलीकडे शंकर भक्तीत महिलांची मोठ्या प्रमाणावर गर्दी याचे श्रेय त्यांनी मिश्रा महाराजांना दिलं. शिवाची आराधना मोफत आणि तो पावल्यानंतर भरभराठ पण मनोभावे भक्ती भोळ्या महादेवाला आवडते. आपण समाजाला मार्गदर्शक करतो पण त्यापुर्वी आपल्या अंगी असलेली पात्रता तपासुन बघायला हवी हे सांगताना त्यांनी धर्मांची गुढी हातात घ्यायची आणि अधर्माने वागायचं अशा बेगड्या अध्यात्मावर टिका केली. सर्वस्वाचा त्याग करून प्रसंगी संसाराचाही त्याग केला तर खऱ्या अर्थाने वारकरी तोच होवु शकतो धर्माच्या मंडपात रामकृष्ण उच्चारण करा आपल्या हृदयातील विकार बाहेर आपोआप पडल्याशिवाय राहणार नाहीत हे सांगताना त्यांनी उपस्थित भाविकांना दोन्ही हात वर करत शिवभजन ठेका धरून म्हणायला लावले. विविध दृष्टांत आणि अध्यात्मिक संदर्भ देत महाराजांनी तब्बल दोन तास किर्तन सेवेच्या माध्यमातुन उपस्थित भाविकांना समजेल असे ज्ञानार्जन केले. धुनकेश्वर श्रावण सोमवार महोत्सव समितीच्या वतीने त्यांचा पुष्पहार,धुनकेश्वराची प्रतिमा देऊन सत्कार केला. कार्यक्रमाची सांगता महाआरती, महाप्रसादाने झाली. दरम्यान सोमवारी दर्शन घेण्यासाठी वडवणी, धारूर, माजलगाव आदी तालुक्यातुन मोठ्या प्रमाणावर भाविक भक्तांची गर्दी होती. यावेळी भाजपा प्रवक्ते राम कुलकर्णी, गायनाचार्य ह.भ.प तुळशीराम महाराज अतकरे, गायनाचार्य ह.भ.प. माऊली महाराज औटे, सुभाष महाराज आजबे, शिवाजी महाराज नांदे, मृदंगाचार्य माऊली महाराज सावंत यासह परिसरातील भजनी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा धार्मिक सोहळा सर्व ग्रामस्थ मिळुन साजरा करतात.

-----------------------------------------

कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये द्वितीय कीर्तन पुष्प समर्पित करताना व्यक्त केले.

या कीर्तनात मृदुंगसाथ ह.भ.प. अरुण महाराज कदम व ह.भ.प. ऋषिकेश महाराज जाधव कीर्तनात कीर्तन साथ ह.भ.प. सुग्रीव महाराज डाके, ह.भ.प. भागवत महाराज नरवडे व ह.भ.प.भीमराज महाराज घुगे नाशिक यांनी दिली. श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे सद्गुरु संत किसन बाबा महाराज यांच्या पुण्यस्मरणार्थ होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये कीर्तन, प्रवचन, अभंगवाणी, संगीत भजन, हरिजागर, भारुड असे भक्तिमय कार्यक्रमाने गोरक्षनाथ टेकडी भक्ती रसात न्हाऊन निघाली आहे दोन दिवसापासून पंचक्रोशीतील भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती लावत आहेत.

-----------------------------------------

पीएम योजना, नमो शेतकरी निधी, पिक विमा योजना, पीक कर्ज योजना, कृषी योजना, नैसर्गिक नुकसान, जमीन खरेदी विक्री व व्यवहार, पिक कर्ज माफी, शासकीय धान खरेदी व्यवहार, महसूल व पंचायत समिती योजना यासाठी आवश्यक. इत्यादी विविध योजनांचा सहभागासाठी आवश्यक आहे. सातबारावर ज्या शेतकऱ्यांची नावे आहेत त्यांनी फार्मर आयडी काढून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे :- आधार कार्ड, सातबारा किंवा आठ उतारा, आधार कार्ड सलग्न असलेला मोबाईल नंबर ( ओटीपी करिता ). तरी उर्वरित शेतकऱ्यांनी फॉर्मर आयडी काढून शासनास सहकार्य करावे असे आवाहन बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी वारंवार केले आहे . फॉर्मर आयडी नोंदणी केल्याशिवाय कोणतेही शासकीय काम होणार नाही याची सर्व शेतकरी ग्राहकांनी नोंद घ्यावी.

-----------------------------------------

## परळी वैजनाथ :पोस्ट ऑफिसमध्ये सावळा गोंधळ –ऐन राखी पोर्णिमेच्या तोंडावर स्पीड पोस्टसह अनेक महत्वाच्या सेवा ठप्प



परळी वैजनाथ, प्रतिनिधी- परळी शहरातील मुख्य पोस्ट ऑफिसमध्ये सध्या अक्षरशः सावळागोंधळ निर्माण झालेला असुन, ऐन राखी पोर्णिमेच्या तोंडावर स्पीड पोस्टसह अनेक महत्वाच्या सेवा ठप्प झाल्या आहेत. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

परळी पोस्ट ऑफिस गेल्या अनेक दिवसांपासून गलथान व उदासीन कारभारासाठी कुप्रसिद्ध झाले आहे. कर्मचारी वर्गाचा उद्धटपणा आणि पोस्टमास्तर यांची बेजबाबदारी यामुळे पोस्ट सेवांचा अक्षरशः बट्ट्याबोळ झाला आहे.स्पीड पोस्ट व महत्वाच्या पार्सलसवर गोंधळ बघायला मिळत आहे. अनेक नागरिकांची राखी, भेटवस्तू, कागदपत्रे वेळेत पोहोचणे अवघड झाले आहे. पोस्ट ऑफिसमध्ये कुणालाही विचारले की, उत्तर देताना उद्धटपणा केला जातो. लोकांनी सरकारी सेवेवर विश्वास ठेवायचा की नाही? असा सवाल उपस्थित होत आहे.उच्च अधिकाऱ्यांनी तातडीने या गोंधळाची दखल घ्यावी आणि जबाबदार कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी सध्या नागरिकांतून जोर धरु लागली आहे..

हॅलो बीड संघर्षनेता
बुधवार दि. 06 ऑगस्ट 2025

# भाजपा अल्पसंख्याक मोर्चा परळी शहर अध्यक्षपदी समी शेख यांची नियुक्ती



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) - 2009 पासून स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांचे कट्टर समर्थक म्हणून ओळख मिळवलेले समी शेख यांची भाजप अल्पसंख्याक मोर्चाच्या परळी शहर अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते सोमवार, दि 4 ऑगस्ट रोजी नियुक्तीपत्र देण्यात आले. नियुक्तीबद्दल पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांकडून समी शेख यांचे अभिनंदन केले जात आहे आणि त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा देखील मिळत आहेत. मुंडे साहेबांच्या हयातीत आणि त्यांच्या हयाती नंतरही समी शेख यांनी भाजप आणि मुंडे कुटुंबासाठी निष्ठेने व इमानदारीने काम केले आहे. त्यांच्या समर्पण आणि निष्ठेला लक्षात ठेवून, राज्याच्या पर्यावरण मंत्री माननीय पंकजाताईसाहेब मुंडे, व परळी चे भाजपा शहरअध्यक्षा उमाकाकु समशेट्टी व

सर्व मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये **पान 3 वर**

# बुद्ध विहार सिरसाळा येथे भंते डॉ. एम. सत्यपाल यांची प्रेरणादायी धम्मदेशना



सिरसाळा : सम्राट अशोक बुद्ध विहार, सिरसाळा येथे पूज्य भंते डॉ. एम. सत्यपाल यांची प्रेरणादायी धम्मदेशना संपन्न झाली. कार्यक्रमाची सुरुवात महापरुषांना अभिवादन व त्रिसरण पंचशील घेऊन करण्यात आली. प्रसंगी भंते डॉ एम सत्यपाल यांनी बुद्ध, धम्म व संघ या त्रिरत्नांवरील श्रद्धेचे महत्व विशद केले. "संस्कारातून संस्कृतीची निर्मिती होते" या मूलमंत्रावर त्यांनी उपासक-उपासिकांना मार्गदर्शन केले आणि दहा पारमिता पाळण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. दयानंद झिंजुर्डे यांनी केले. सूत्रसंचालन बौद्धाचार्य साहेबराव किरवले यांनी केले, तर आभार प्रदर्शन उपा. सुभाष लिंबाजी चोपडे यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती व यशोधरा महिला मंडळ, सिरसाळा **पान 3 वर**

# महादेव मुंडे प्रकरणी पुन्हा नव्याने तपास होणार; पंकज कुमावत परळीमध्ये दाखल, हालचाली वाढल्या





महादेव मुंडे खून प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नेमणूक केलेली एसआयटी काल (04 ऑगस्ट) परळीमध्ये दाखल झाली. घटनास्थळावर तब्बल साडेतीन तास एसआयटीचे प्रमुख पंकज कुमावत यांनी या घटनेची माहिती घेतली.

काल (4 ऑगस्ट) दिवसभर महादेव मुंडे प्रकरणाचा जुना तपास बघितल्यानंतर आता पुन्हा एकदा या तपासाला नव्याने सुरुवात होणार आहे. या घटनेमध्ये महादेव मुंडे यांचा खून झाला, त्यादरम्यानचे कॉल रेकॉर्ड तपासण्यावर एसआयटीचा भर असेल. हे कॉल रेकॉर्ड तपासल्यानंतरच या घटनेवेळी परिसरात कोण कोण होते, याची माहिती समोर येऊ शकणार आहे. याआधीच मुंडे कुटुंबीयांकडून काही पोलिस अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांचे देखील सीडीआर तपासण्याची मागणी करण्यात आली आहे.

# जमीन व्यवहारातील आर्थिक वादातून अंबाजोगाईतील व्यावसायिकाचा मृत्यू

## ; पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल



अंबाजोगाई : जमीन खरेदी व्यवहारातील आर्थिक तणावामुळे अंबाजोगाई शहरातील व्यवसायिकाचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याचा आरोप मृताच्या पत्नीने केला आहे. या प्रकरणी पाच जणांविरुद्ध अंबाजोगाई शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल न झाल्यास अंत्यविधी न करण्याचा पवित्रा मृताच्या कुटुंबीयांनी घेतल्याने, सोमवारी रात्री उशिरा पोलिसांनी गुन्हा नोंदवला. मंगळवारी (5 ऑगस्ट) मृताचा अंत्यविधी करण्यात आला. या घटनेमुळे अंबाजोगाईत खळबळ उडाली आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फातेमा शेख (वय 40, रा. गांधी नगर, अंबाजोगाई) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, त्यांचे पती जावेद अली शेख यांचा मृत्यू सहव्यावसायिकांनी दिलेल्या मानसिक त्रासामुळे झाला. जावेद अली शेख यांचा प्लॉटिंगचा व्यवसाय होता. 28 जुलै 2023 रोजी त्यांनी हमीद मुस्तफा खान (रा. रिसोड, जि. वाशिम) यांच्याकडून 20 एकर **पान 3 वर**

# श्रीनिवास राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली जय भवानी गणेश मंडळ कार्यकारणी जाहीर

## » जय भवानी गणेश मंडळ अध्यक्षपदी महेश गायकवाड तर सचिवपदी गौरव राऊत यांची निवड





परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर परळी शहरातील सामाजिक उपक्रमांसाठी प्रसिध्द असलेल्या जय भवानी गणेश मंडळाची नूतन कार्यकारिणी जय भवानी गणेश मंडळाचे मार्गदर्शक व आयोजक श्रीनिवास राऊत यांच्या उपस्थितीत नुकतीच उत्साही वातावरणात कार्यकारणी जाहीर करण्यात आली. जय भवानी गणेश मंडळ अध्यक्षपदी महेश गायकवाड तर उपाध्यक्ष गजानन चलोदे व सचिवपदी गौरव राऊत यांची निवड यांची निवड करण्यात आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, परळी शहरातील जय भवानी गणेश मंडळाची नूतन कार्यकारिणी निवडी संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. जय भवानी गणेश मंडळाचे मार्गदर्शक व आयोजक श्रीनिवास राऊत यांच्या उपस्थितीत नूतन कार्यकारणी जाहीर करण्यात आली. यामध्ये अध्यक्ष महेश **पान 3 वर**

# बीड जिल्ह्यात 11 वीची प्रवेश क्षमता61 हजार अर्ज फक्त 26 हजार

बीड, :- यावर्षी पासून अकरावीची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आली. आतपर्यंत बीड जिल्ह्यात 26 हजार 540 अर्ज आले आहेत. प्रवेशाची क्षमता 61 हजार 40 एवढी आहे. अकरावीची प्रवेश प्रक्रिया दिवसेदिवस कमी होवू लागली. विद्यार्थी कला, वाणिज्य या शाखेला प्रवेश घेण्याऐवजी इतर कोर्ससाठी ॲडमिशन घेत असल्याने प्रवेश प्रक्रियेची संख्या कमी होत असल्याचे दिसून येत आहे. बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यातील प्रवेश संख्या कमी झालेली आहे.

विभागात 2 लाख जागा रिक्त आहेत.

दहावीचा निकाल लागल्यानंतर काही दिवसांनी अकरावीच्या प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु झाली. ही ऑनलाईन प्रक्रिया 21 मे पासून सुरु झालेली आहे. बीड जिल्ह्यामध्ये प्रवेशाची क्षमता 61 हजार 40 एवढची असून आता पर्यंत फक्त 26 हजार 540 अर्ज आलेले आहेत. कमी प्रमाणात अर्ज येण्याचे कारण म्हणजे विद्यार्थी वेगवेगळ्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेवू लागल्याने कला, वाणिज्य या सारख्या शाखेला प्रवेश घेण्याची संख्या कमी होवू लागली आहे. विभागात देखिल अकरावीची प्रवेश क्षमता कमी आहे. विभागामध्ये 2 लाख जागा रिक्त आहेत. **पान 3 वर**

# ऊसतोड मजुरांनो "मिशन साथी" चा लाभ घ्या : राज्य संघटक बाप्पासाहेब भांगे

## ऊसतोड मजुरांच्या सक्षमीकरणासाठी आज मिशन साथीचा भव्य शुभारंभ

**वडवणी ।सतिश मुजमुले**



बीड जिल्ह्यातील हजारो ऊसतोड मजुरांच्या आयुष्यात ठोस बदल घडवून आणण्यासाठी आजपासून "मिशन साथी" या उपक्रमाचा भव्य शुभारंभ करण्यात येत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. अजितदादा पवार यांच्या हस्ते सकाळी 11 वाजता बीड येथे या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा आरंभ होणार आहे.

बीड जिल्ह्यात ऊसतोड मजुरांची संख्या राज्यात सर्वाधिक आहे. ऑक्टोबर ते एप्रिल या कालावधीत गाळप हंगामात हजारो कुटुंबं स्थलांतरित होतात. या स्थलांतरामुळे मजुरांच्या मुलांच्या शिक्षणात अडथळा निर्माण होतो. यावर उपाय म्हणून 2024-25 मध्ये 196 हंगामी निवासी शाळांद्वारे 20,595 विद्यार्थ्यांना शिक्षणात ठेवण्यात यश आले.मिशन साथी" अंतर्गत खालील उपक्रम राबवले जाणार आहेत:महिला आरोग्यसाथींची निवड:

1000 महिलांना आरोग्यसाथी म्हणून प्रशिक्षित करून आरोग्य विभागाच्या **पान 3 वर**

# शासकीय नियमानुसार परळी नगर परिषदेने कत्तलखान्यांना परवानगी देण्याची कुरेशी संघटनेची मागणी



परळी प्रतिनीधी. राज्य शासनाच्या कायदेशीर नियमानुसार परळी शहरात कत्तलखान्यांना परवानगी देण्याची मागणी कुरेशी संघटनेच्या वतीने परळी नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

याबाबत नुकतेच काल दिनांक 4 जुलै रोजी कुरेशी संघटनेच्या वतीने परळी नगर परिषदेचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, आमच्या भागात पारंपारिक पद्धतीने चालणाऱ्या जनावरांच्या यामध्ये म्हैस, रेडा, शेळी, मेंढी कत्तल्लीचे कायदेशीरपणे लघु कत्तलखाने सुरु करण्याचे परवानगी देण्यात यावी. महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभाग यांच्या 22 जुलै 2014 च्या परिपत्रकानुसार ज्या गावांमध्ये 9 किंवा त्यापेक्षा कमी जनावरांची दररोज कत्तल होते. तेथे मॉडर्न स्लाटर हाऊसचे गरज नाही. तसेच प्रदूषण कंट्रोल बोर्डाचे ना हरकत प्रमाणपत्राचे **पान 3 वर**

# कानिफनाथ माध्यमिक विद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊसाठे यांची जयंती साजरी



माजलगाव / अनंत घडसिंगे :- कानिफनाथ माध्यमिक विद्यालय मोहखेड येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली या वेळी सांस्कृतिक विभागाचे श्री कल्याण व्हरकटे सर यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर प्रकाश टाकला तसेच तसेच श्री गणेश काशीद सर यांनी सांगितले की आपण प्रत्येक महापुरुष्यांचे ब्रीद व्याक्य लक्ष्यात घेऊन जरी वागलो तरी आपल्यात खुप परिवर्तन होईल सामाजिक सलोखा ठेऊया असे संबोधले श्री राजेभाऊ निरडे सर यांनी अणभाऊ यांचा वाटेगाव ते राशिया पर्यंतचा प्रवास सांगुन विद्यार्थ्यांना संबोधित केले श्री चव्हान सर यांनी 1947 ला देश स्वातंत्र्यझाल्यानंतर ला मुंबई येथील मोर्च्यात "ये आझादी झुटी है देश की जाणता भूखी है" अण्णभाऊंचा दिलेला नारा **पान 3 वर**

# माजलगाव येथे माहेश्वरी महिला मंडळा श्रवण मासा निमित्ताने श्रीरामचरित्र मानसचे नवान्ह पारायण




माजलगाव / प्रतिनिधी माजलगाव येथील राजस्थानी मंगल कार्यालयात रामायणाचे पाठाचे वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. माजलगावच्या विख्यात गायिका श्रीमती छाया राजेंद्र शर्मा यांच्या सुमधुर वाणी मध्ये पारायणाचे गायन होत आहे.

श्रीमती शर्मा या माजलगावचे स्वर्गीय बाबूलाल शर्मा यांच्या सुनबाई आहेत. आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात रुची असल्यामुळे आपल्या व्यस्त दैनदिनातुन वेळ काढून माहेश्वरी महिला मंडळाच्या आग्रहास मान देऊन छाया राजेंद्र शर्मा नवान्ह पारायणमध्ये निष्काम **पान 3 वर**

# खालापूरी येथील दलितांच्या गायरान जमिनीवरील सौरऊर्जा प्रकल्प हटवा, आत्महत्या ग्रस्त कुटुंबाला मदत द्या - डॉ. जितीन वंजारे



बीड / प्रतिनिधी खालापुरी येथील गायरान जमीन गेल्या अनेक वर्षापासून येथील दलित शोषित पीडित लोक कसत होते. ती जमीन कसून त्यांचा पोटापाण्याचा प्रश्न मिटत होता. पण ग्रामपंचायतच्या जातीयवादी धोरणामुळे त्यांच्याकडून बळजबरी जमिनी एका खाजगी सौर ऊर्जा प्रकल्पाला देऊन गोर गरिबांवर अन्याय केला आहे. त्याच्या विरोधात जाहीर बंड पुकारून येत्या काळामध्ये मोठ आंदोलन करणार असून गोर गरिबांना न्याय देऊ असे सामाजिक कार्यकर्ते डॉ. जितीनदादा वंजारे खालापूरीकर यांनी तहसीलदार शिरूर कासार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

त्याचप्रमाणे खालापुरी येथील अमोल हनुमान खंडागळे या युवा शेतकऱ्याने विष प्राशन करून आत्महत्या केली. त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्या शेतकऱ्याच्या कुटुंबाला नैसर्गिक आपत्ती निवारण समिती तर्फे शासकीय आर्थिक मदत मिळावी यासाठीही निवेदन तहसीलदार यांना दिले. तहसीलदारांनी तात्काळ पाठपुरावा करून सखोल चौकशीचे आस्वासन **पान 3 वर**

# तीन माकडांच्या प्रतिकृतीस अखेर नीता अंधारे यांनीच न्याय दिला - डॉ. संजय तांदळे



बीड / प्रतिनिधी शहरातील जिल्हा कारागृहामागे तसेच माने कॉम्प्लेक्स समोरील चौकात काही वर्षांपूर्वी महात्मा गांधींचा संदेश देणाऱ्या तीन माकडांची प्रतिकृती बसविण्यात आली होती. साधारण पाच वर्षांपूर्वी अज्ञात इसमाने या तीन माकडा पैकी एका माकडाची प्रतिकृती तोडून टाकली होती. ही बाब सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे व मुक्तपत्रकार एस. एम. युसूफ़ यांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी याविषयी पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन प्रसिद्धी माध्यमाद्वारे जिल्हा प्रशासन आणि बीड नगर परिषदेला उद्देशून नासधूस करण्यात आलेल्या माकडाची नवीन प्रतिकृती पूर्ववत बसवावी अशी मागणी केली होती. तसेच 'बुरा मत देखो, बुरा मत सुनो, बुरा मत कहो' असा महात्मा गांधीजींचा मोलाचा संदेश देणाऱ्या या चौकातील माकडांची नवीन प्रतिकृती पूर्ववत बसवून येथे मर्क्युरी लाइट्स लावण्यात यावे. सीसीटीव्ही कॅमेरे लावावे आणि या चौकाला महात्मा गांधी चौक असे नाव देण्यात यावे याकरिता सामाजिक कार्यकर्ता **पान 3 वर**

# बारा ज्योतिर्लिंगाप्रमाणे धुनकेश्वराचा महिमा वाढला! आत्मोद्धारासाठी किर्तन मन लावुन ऐकले तरच प्राप्ती - राजेंद्र महाराज वाघमारे



वडवणी / प्रतिनिधी डोंगरपट्यातील धुनकवाड येथे उंच डोंगराळ प्रदेशावर वसलेल्या धुनकेश्वर मंदिराला श्रावणाच्या दुसऱ्या सोमवारी भाविक भक्तांनी प्रचंड गर्दी केली. पंचक्रोशीतुन हजारोंच्या संख्येने भाविक पाहिल्यानंतर किर्तन सेवेसाठी आलेल्या ह.भ.प. राजेंद्र महाराज वाघमारे गोंदीकर यांनी बारा ज्योतिर्लिंगाप्रमाणे धुनकेश्वराचा महिमा वाढल्याचे सांगितले. भक्तीमय समाजाच्या भावना आकर्षित करण्याची ताकद या दैवतामध्ये निश्चित असुन स्वत:च्या आत्मोद्धारासाठी किर्तन मन लावुन ऐकणे महत्वाचे. पतीचा अनादर करु नका. कारण जिथे अनादर होतो तिथे शंकर पावत नाहीत **पान 3 वर**

# गोरक्षनाथ टेकडी परिस आहे, सेवा करून जीवनाच सोन करा - ह.भ.प.सांगळे महाराज



बीड / प्रतिनिधी गोरक्षनाथ टेकडी हि गुरु शिष्य परंपरेचा वारसा चालवणारी तपोभूमी आहे गोरक्षनाथांनी गुरु मच्छिंद्रनाथांची सेवा केली तशी गुरु किसन बाबा महाराज यांची सेवा सद्गुरु गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांनी केली. गुरु शिष्य सेवेतून गोरक्षनाथ टेकडी हि पुनीत झाली आहे. गोरक्षनाथ टेकडी हि परिस आहे येथे तुमच्या आयुष्याच सोन करायचं असेल तर तुम्ही गोरक्षनाथ टेकडी सेवा करा गुरु किसन बाबा महाराज, गुरु नवनाथ बाबा महाराज यांची सेवा करा नक्कीच तुमच्या जीवनच सोन झाल्याशिवाय राहणार नाही असे अभंग विवेचन करताना ह. भ. प. संत ज्ञानेश्वर महाराज सांगळे मुंबई यांनी विसाव्या शतकातील महान सद्गुरु संत किसन बाबा महाराज यांच्या 27 व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या **पान 3 वर**

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी फॉर्मर आयडी तात्काळ काढून घ्यावा - अनिल बोर्डे



गेवराई / प्रतिनिधी केंद्र सरकारच्या निर्देशानुसार शेतकऱ्या साठी सुरु करण्यात आलेल्या फॉर्मर आयडी नोंदणी मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. शेतकऱ्यांनी यशस्वी रित्या काम पूर्ण केले आहे .जिल्ह्यात हे प्रमाण 73.66% असून उर्वरित शेतकऱ्यांनी तातडीने नोंदणी करावी असे आवाहन जिल्हाधिकारी बीड यांनी केले आहे. तरी त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन उर्वरित राहिलेल्या बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावा. याबाबत बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र यांनी वारंवार आवाहन करून जनजागृती केली आहे .

उर्वरित राहिलेल्या शेतकऱ्याने तात्काळ फॉर्मल आयडी काढून घ्यावा त्याशिवाय खालील फायदे मिळणार नाहीत याची नोंद घ्यावी. **पान 3 वर**